स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत भूगोल विषयातील
पीएच.डी.(विद्यावाचस्पती) पदवी करीता सादर करावयाच्या प्रबंधाचा

संशोधन आराखडा

संशोधन विषय

माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास : लिंग संरचना आणि साक्षरतेचे विशेष विश्लेषण

संशोधक

महादेव देविदास सजगणे
एम.ए.भूगोल, सेट

मार्गदर्शक

डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे
एम. ए, एम.फिल, पीएच. डी.
भूगोल विभाग
बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी – ४३१४०१

संशोधन केंद्र
स्कूल ऑफ अर्थ सायन्स

माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास : लिंग संरचना आणि साक्षरतेचे विशेष विश्लेषण

प्रस्तावना :

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक प्रमुख शाखा आहे. या विषयाचे स्वरुप इतके विस्तृत आहे की, त्याचा स्वतंत्र अभ्यास विशिष्ट अशा शाखेमध्ये करावा लागतो. जी. टी.त्रिवार्था यांना लोकसंख्या भूगोलाचे जनक मानतात. कारण १९५३ मध्ये अमेरिकन भूवैज्ञानिकांच्या परिषदेत बोलताना लोकसंख्या भूगोल ही एक स्वतंत्र शाखा आहे असे त्याने प्रतिपादन केले. दुसऱ्या महायुध्दानंतर लोकसंख्या भूगोल या विषयाचा विकास झाला असला तरी लोकसंख्येसंबंधीचा अभ्यास फार पूर्वीपासून चालू आहे. ख्रिस्तपूर्व ३२१ व २६१ दरम्यान कौटिल्य अर्थशास्त्र नामक ग्रंथात लोकसंख्येची आर्थिक व शेती संबंधात गणती कशी करावी याचे विवेचन आढळते. तसेच

लोकसंख्येच्या शास्त्रशुध्द अभ्यासास सतराव्या शतकापासून सुरुवात झालेली आढळते. जॉन गॉंट (John Graunt) याने लंडन व सभोवतालच्या परिसर तेथील मृत्यू दाखले वापरुन महत्वाचे लोकसंख्या विषयक निष्कर्ष काढले.एडमंड यांनी सरासरी आयुर्मान ही संज्ञा प्रथम वापरली. १७६६ ते १८३४ या दरम्यान थॉमस माल्थस याने लोकसंख्या वाढीचा वेग व अन्नधान्य उत्पादनाचा वेग यातील तफावत जाणून एक महत्वाचा सिध्दांत मांडला. म्हणून माल्थसला लोकसंख्या विज्ञानाचा जनक असे म्हटले जाते.

एकोणिसव्या शतकात वैद्यकिय शास्त्रात प्रगती होवू लागली. त्याचा परिणाम म्हणजे मृत्यूदरात झपाटयाने घट झाली. संसर्गजन्य रोगावर मात करण्यात आली. आयूर्मानात वाढ झाली व लोकसंख्या वाढीवर परिणाम झाला. एकोणिसव्या शतकाच्या अखेरीस जनन या घटकाबद्दल अभ्यास सुरु झाला. एकोणिसव्या शतकातच लोकसंख्या शास्त्रातील स्थलांतर या महत्वपूर्ण अंगाच्या अभ्यासालाही महत्व प्राप्त होवू लागले. अशाप्रकारे लोकसंख्या अभ्यासाला मोठी चालना मिळाली.

सामाजिक शास्त्राच्या रुपात भूगोलाच्या नवीन शाखा स्वतंत्र अभ्यास क्षेत्र म्हणून वेगळया होत गेल्या. आर्थिक भूगोल, मानव भूगोल व राजकीय भूगोल यामध्ये मानव आतापर्यंत सहअध्ययनाचा विषय राहिला. आता त्याला स्वतंत्र अध्ययनाचा विषय मानुन अध्ययन करणे गरजेचे झाले. यातूनच 'लोकसंख्या भूगोल' या भूगोलाच्या नवीन शाखेचा उदय झाला.

सामाजिक विज्ञानात लोकसंख्येचा अभ्यास हा भूगोल शास्त्रज्ञाचा मुख्य विषय झाला आहे. तथापि विविध विषयाचे अध्ययन क्षेत्र भिन्न आहे. परंतू लोकसंख्येच्या ऐतिहासिक आणि क्षेत्रीय विश्लेषणात प्रत्येक विषयाचे महत्वाचे योगदान आहे. (Woods १९७०) भूगोल शास्त्रामध्ये लोकसंख्येच्या वितरणाचे अध्ययन सुरुवातीच्या काळापासून मानव भूगोल शास्त्रज्ञांचे आकर्षण राहिला आहे. भौगोलिक अध्ययनाला प्रारंभापासूनच दोन भागामध्ये विभाजीत करण्यात येते. परंतू मानवाचे भौगोलिक अध्ययनामध्ये काय स्थान आहे. या प्रश्नावर भूगोल शास्त्रज्ञांमध्ये नेहमी मतभेद राहिले. कारण सुरुवातीस भूगोलास एक प्राकृतिक विज्ञान मानले जात होते. म्हणूनच याच्या अध्ययनात भूमीला (प्राकृतिक घटकांना) प्रमुखता प्रदान केली गेली. परंतू भूमीवर निवास करणारे गौणच ठेवले गेले. परंतू भूगोल एक सामाजिक विज्ञान आहे. अशी विचारधारा प्रगल्भ झाल्यानंतर भौगोलिक अध्ययनामध्ये लोकसंख्या आणि लोकसंख्येशी संबंधीत समस्यांचे अध्ययन करण्यात मोठया प्रमाणात वृध्दी झाली. अशा प्रकारे भौगोलिक अध्ययनात प्राकृतिक पर्यावरणामध्ये मानवास प्राथमिकता देण्यात येवू लागली. संयुक्त राज्य अमेरिकेत Jeferson (१९०९), Becker १९२८ आणि Mekarti १९४२ यांनी लोकसंख्येच्या अध्ययनावर अनेक शोधनिबंधक लिहिले. ब्रिटेनमध्ये Aurther Gedes १९४१ फ्रान्समध्ये Vidal-de-la Blache & Jean Brunch.macksmilian prose, फेड्रिक रॅटझेल यांनी मानवाला भौगोलीक अध्ययनाचा केंद्रबिंदू बनवले. १९५३ साली Triwartha यांनी अमेरिकन भूगोल परिषदेत 'लोकसंख्या भूगोलास' एका नवीन शारखेच्या रुपात प्रस्तुत केले. म्हणजे भूगोल हे लोकसंख्या भूगोल' या नवीन शाखेचा उदय झाला.

अभ्यास क्षेत्र :

सदरील संशोधनाचे अभ्यास क्षेत्र हे बीड जिल्ह्यातील माजलगाव व गेवराई हे तालुके असून या दोन जिल्ह्यातील माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास : लिंग संरचना आणि साक्षरतेचे विशेष विश्लेषण हा संशोधनाचा विषय आहे. माजलगाव आणि गेवराई हे बीड जिल्ह्यातील महत्वाचे तालुके असून त्यांच्या सीमा औरंगाबाद, जालना, व परभणी ह्या जिल्ह्यास लागून आहे. गेवराई व माजलगाव तालुक्याचे स्थान बीड ह्या मुख्य प्रशासकीय क्षेत्राच्या अनुक्रमे उत्तरेस व ईशानेस आहे. गेवराई च्या दक्षिणेस बीड व शिरूर हे तालुके असून माजलगावच्या दक्षिणेस धारूर , परळी, व नैऋत्येस वडवाणी तालुके आहेत. गोदावरी नदी माजलगाव व गेवराई तालुक्यांच्या उत्तर सीमेवरून वाहत असून ह्या तालुक्यातील जमीन सुपीक काळया प्रतीची आहे व प्रामुख्याने शेतीस पोषक आहे. तसेचसिंधफना ही माजलगाव तालुक्यातील एक प्रमुख नदी आहे.

माजलगाव तालुक्याचा अक्षवृत्तीय स्थान १९°१५' उत्तर असून रेखावृत्तीय स्थान ७६°२३' पूर्व असा आहे. तर गेवराई तालुक्याचे अक्षवृत्तीय स्थान १९°१६ उत्तर असून रेखावृत्तीय स्थान ७५°४५ पूर्व असे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार माजलगाव तालुक्याची लोकसंख्या ४९,४५३ इतकी असून लोकसंख्येची घनता ३३० किमी ^{2} इतकी आहे. तर तालुक्याचा एकूण साक्षरता दर ७२% आहे. माजलगाव तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ ३५.०८ किमी ^{2}इतके आहे. तर गेवराई तालुक्याची लोकसंख्या ३३,५६२ इतकी असून लोकसंख्येची घनता २३९.४ कि.मी. इतकी आहे. तर तालुक्याचा एकूण साक्षरता दर ६२.९६% आहे. गेवराई तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ 20 कि.मी. इतके आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि गेवराई तालुक्यांचा लोकसंख्येचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. त्या उद्दिष्टपूर्तीसाठी पुढील घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१) माजलगाव आणि गेवराई तालुक्याचा प्राकृतिक, सामाजिक आणि आर्थिक घटकांचा अभ्यास करणे.

२)अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची घनता, वृध्दी आणि वितरणाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) अभ्यास क्षेत्रातील लिंगरचना, वयरचनांचा अभ्यास करणे.

४) अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येची साक्षरता अभ्यास करणे.

५) अभ्यास क्षेत्रातील शहरीकरण वृद्धीचा अभ्यास करणे.

गृहीतके :

१) माजलगाव आणि गेवराई तालुक्याचा प्राकृतिक, सामाजिक आणि आर्थिक भिन्नता आढळून येते.

२) अभ्यासक्षेत्रातील लोकसंख्या सामाजिक घटकामध्ये भिन्नता असावी.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनासाठी व्दितीयक माहिती स्रोताचा उपयोग केला जाणार आहे. ही माहिती जिल्हा जनगणना पुस्तिका, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, बीड जिल्हा राजपत्र विभागीय हवामान शास्त्र कार्यालय, प्रकाशित अप्रकाशित नकाशे आणि शासकीय प्रकाशनामधून घेतली. प्राकृतिक, सामाजिक घटकांची माहिती बीड जिल्हा राजपत्र या मधून घेतली जाणार आहे. तापमान व पर्जन्य या हवामान विषयक घटकांची माहिती विभागीय वेध शाळेतून मिळवली. लोकसंख्येचे वितरण घनता वृध्दी लिंग रचना, साक्षरता आश्रितांचा अनुपात कामगारांची लोकसंख्या, कामगाराचे प्रकार नागरीकरण या घटकाची माहिती २००१ आणि २०११ च्या जिल्हा जनगणना पुस्तिकेमधून घेतली जाईल. बाजार केंद्र, पोषण घनता, वय रचना, आर्थिक क्रिया या सर्व घटकांची माहिती जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन पुस्तिकेमधून घेतली जाईल.

अनुसुचीत जाती व जमातीची लोकसंख्या, ग्रामीण नागरी साक्षरता स्त्री - पुरुष प्रमाण लोकसंख्येची घनता व वृध्दी या घटकांच्या आकडेवारीचा उपयोग सदर प्रबंधामध्ये केला आहे.

तसेच अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येच्या विविध वैशिष्टयांचे मोजमाप करण्यासाठी व स्पष्टीकरण करून निष्कर्ष काढण्यासाठी विविध सुत्राचा वापर करण्यात येतो.

१. दर चौ.कि.मी.ची लोकसंखेची गणितीय घनता काढण्यासाठी खालील सूत्रांचा वापर कण्यात येतो आहे.

लोकसंख्या घनता = एकूण लोकसंख्या / एकूण क्षेत्रफळ

$$\text{लोकसंख्या घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{एकूण क्षेत्रफळ}}$$

२. एकूण साक्षरता दर काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला जातो .

$$\text{साक्षरता दर} = \frac{\text{एकूण साक्षर लोकसंख्या}}{\text{एकूण लोकसंख्या}} \times १००$$

३. लिंग गुणोत्तर (दर हजारी स्त्रियांचे प्रमाण) काढण्या साठी खालील सुत्राचा उपयोग करण्यात येतो.

$$\text{लिंगगुणोत्तर} = \frac{\text{एकूण स्त्रियांची संख्या}}{\text{एकूण पुरुषांची संख्या}} \times १०००$$

४. दरहजार लोकसंखेमागे मृत्यूदर काढण्या साठी खालील सूत्राचा वापर करण्यात येतो.

$$\text{मृत्यूदर} = \frac{\text{विशिष्ट वर्षातील मृत्यूसंख्या}}{\text{त्याच वर्षातील एकूण लोकसंख्या}} \text{ x } १००$$

संशोधन साहित्याचा आढावा :

१) Clarke John यांनी १९६२ साली 'Population Geography' या पुस्तकात लोकसंख्येच्या वैशिष्टयांवर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण केले आहे. लोकसंख्या भूगोलाच्या विकासामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांच्या मते लोकसंख्या भूगोलाचे कार्य लोकसंख्येचे वितरण, संरचना, स्थलांतर, क्षेत्रीय प्रतिरुप या घटकांचा अन्य घटकांशी कसा संबंध आहे हे केले आहे. एखादया प्रदेशातील भौगोलिक लक्षणाची निर्मिती कशा प्रकारे झाली आहे आणि त्याची प्रतिक्रिया स्थान आणि वेळ या दोन्हीच्या परिवर्तनावर कशी होते. या संदर्भात स्पष्टीकरण केले आहे.

२) Peters G.I. and Larkin R.P. यांनी लोकसंख्या भूगोलाच्या विकासासाठी "Population Geography : Problems, concepts and prospects" हे पुस्तक लिहिले.

३) Demoko G.J. यांनी १९७० साली Population Geography : A Reader या ग्रंथाची रचना केली. त्यांच्या मतानुसार लोकसंख्या भूगोलातच लोकसंख्येच्या अध्ययनात अतिशय महत्वाचे स्थान आहे.

४) Das K.N. यांनी १९७३ साली बिहारच्या कोसी प्रदेशातील लोकसंख्येचा अभ्यास केली.

५) Sharma P.R. यांनी १९७८ साली छत्तीसगड प्रदेशातील लोकसंख्येची वृध्दी आणि वितरणाचा अभ्यास केला.

६) Prithvish Nag यांनी १९८९ साली जगातील देशाचे त्यांच्या आकार आणि लोकसंख्येनुसार अभ्यास केला.

७) Yusuf Khan यांनी १९९० साली पूणे विद्यापीठात शोधप्रबंध सादर केला आहे. हा प्रबंध 'Western Maharashtra Study in Population' या शीर्षकाचा असून यामध्येलोकसंख्येच्या वैशिष्टयांचे अध्ययन केले.

८) Gatade D.G. Geogrphical Analysis of Rural Population Concentration in Maharashtra' या शोध निबंधास ग्रामीण लोकसंख्येच्या वितरणाचे अध्ययन केले.

विषय निवडीचे महत्व :

बीड हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून ते बालाघाट डोंगरांच्या पायथ्याशी बिंदुसरा नदीच्या खोऱ्यात वसलेले आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६९३ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या ३.४५% एवढे आहे. जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२८ उत्तर ते १९°२८ उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७४°५४ पूर्व ते ७६°५७ पूर्व असा आहे. जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग गोदावरीच्या खोऱ्यात आहे तर दक्षिणेकडील भाग मांजरा नदीच्या खोऱ्यात आहे. बीड जिल्हा हा मुख्यतः मध्ययुगीन काळात उदयास आला असून यास ऐतेहासिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, व नैसर्गिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून सदरील संशोधनात माजलगाव आणि गेवराई तालुक्यातील लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास लिंग संरचना आणि साक्षरतेचे विशेष विश्लेषण संरचनेचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. आतापर्यंत माजलगाव आणि गेवराई तालुक्यांतील लोकसंख्या संरचनेचा अभ्यास केला गेलाला नाही. त्यामुळे सदर तालुक्यांच्या अभ्यासाचे महत्व लक्षात घेवून सदर विषयाची निवड केली. माजलगाव आणि गेवराई तालुक्याला नैसर्गिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. इ.स. पूर्व काळापासून या प्रदेशात मानवी जीवन अस्तित्वात असल्याचे आज सिद्ध झाले आहे. मध्ययुगीन काळापासून या प्रदेशाचा विकास झालेला दिसून येतो. परंतु या सर्व तालुक्यातील लोकसंख्या संरचनेचा अभ्यास आजतागायत झालेला नव्हता. तालुक्यातील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक विविधते बरोबर भौगोलिक विविधता लक्षात घेवून व या विषयाचे महत्व लक्षात घेवून सदरील विषय निवडण्यात आला आहे.

लोकसंख्या भूगोलाची संकल्पना :

'लोकसंख्या भूगोल' ही भूगोल शास्त्राची एक उपयोजित शाखा आहे. लोकसंख्या भूगोलाच्या अध्ययनाचा मुख्य बिंदूमानव आहे. मानवाची संस्कृती, आर्थिक क्रिया, निसर्गाशी असणारे संबंध या घटकांमधून लोकसंख्येच्या क्षेत्रीय विविधतेची कल्पना येते. लोकसंख्या भूगोल लोकसंख्येच्या विविध वैशिष्टयांचे अध्ययन करीत असते. हे वैशिष्टये विविध भौगोलिक प्रदेशामध्ये वेगवेगळे असून त्यांचे संबंध प्राकृतिक,सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांशी असतात.

Clarke १९६५ क्लार्क यांच्या मतानुसार 'लोकसंख्या भूगोल वितरण, संघटन, स्थलांतर आणि लोकसंख्येची वृध्दी यांच्याशी संबंधीत आहे.' हे सर्व घटक क्षेत्रीय भिन्नतेनुसार एकमेकांशी संबंधीत असतात. म्हणून भूगोल तज्ञांनी विविध प्रदेशाचे नकाशे तयार करुन क्षेत्रीय भिन्नतेला प्रदर्शित करण्याचे प्रयत्न केले. लोकसंख्या भूगोल ही भूगोलाची एक प्रगत शाखा आहे. या शाखेचा मुख्य आधार लोकसंख्येमधील प्रादेशिक भिन्नता हा आहे. मॅडम गॉर्नियर यांनी आपल्या 'Geography of Population' या पुस्तकामध्ये लिहिले आहे की, लोकसंख्या भूगोलाचा संबंध लोकसंख्या ज्या वातावरणामध्ये राहते. त्या वातावरणाचा लोकसंख्येवर पडणारा प्रभाव व त्यांची वैशिष्टये यांच्याशी आहे. (Garnier १९६६) लोकसंख्या भूगोलातून एखादया प्रदेशातील भौगोलिक घटक दुसऱ्या प्रदेशाला कशाप्रकारे प्रभावित करते त्याची कल्पना येते. Zelinsky १९६६ यांच्या मतानुसार, लोकसंख्या भूगोलामध्ये लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्येची उत्पादकता, विभिन्न गट वसाहती आणि समाजाशी असणारे संबंध यांचे अध्ययन केले जाते. लोकसंख्या भूगोलाच्या अध्ययनातून प्रस्थापित झालेल्या गटाचे एकमेकाशी असणाऱ्या संबंधाची माहिती मिळते. कारण लोकसंख्या भूगोलात लोकसंख्येच्या वैशिष्टयांचे अध्ययन केले जाते. लोकसंख्या भूगोल एक असे विज्ञान आहे. ज्यामध्ये त्या विधीचे विश्लेषण होते. ज्या एखादया स्थळातील भौगोलिक गुणांमधून निर्माण होतात आणि यांच्या प्रक्रियेमधूनच लोकसंख्येचे निर्माण होते. (Zelinsky १९६६) लोकसंख्या भूगोल हे मुख्य रुपाने मानवाचे शास्त्र नसून ते मानव आणि पृथ्वी यांच्यातील संबंधाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे. 'लोकसंख्या भूगोल' ही भूगोल विषयाची एक नवीन शाखा असून या शाखेला क्रमबद्ध रुपात विकसित करण्याचे श्रेय ‘त्रिवार्था' यांना जाते. त्यांच्या मतानुसार लोकसंख्या मुख्य उद्देश लोकसंख्येचे अध्ययन करणे आहे. पृथ्वीवर असणाऱ्या लोकसंख्येतील प्रादेशिक विविधतेला प्रदर्शित करणे हा लोकसंख्या भूगोलाचा उद्देश असून लोकसंख्येचे वितरण, घनता, स्थलांतर वृध्दी या लोकसंख्या भूगोलाच्या व्याप्ती आहे. (Trewartha १९६९) लोकसंख्या भूगोल लोकसंख्येचे पृथ्वीवर असलेल्या वितरणाचे अध्ययन, लोकसंख्येचे वैशिष्टये आणि त्यांचे भौगोलिक वातावरणाशी असणाऱ्या संबंधातून करते (Sawant and Athawale १९९४) लोकसंख्येचे अध्ययन हे लोकसंख्येचे वितरण, ग्रामीण -

नागरी स्थान, घनता, वृध्दी, उत्पादकता, स्थानांतर आणि पथ, लिंग धर्म या घटकांवर अवलंबून असते. (Trewartha, २०००) भूगोल तज्ञ प्रत्यक्ष राजकीय घटकांचे सुध्दा अध्ययन करतात. १९५१ ते २०११ या काळात भारताची लोकसंख्या दुपटीने वाढली आहे. मागील ५० वर्षापासून भारताच्या लोकसंख्येत वृध्दी होत आहे याच काळात बीड जिल्हयात लोकसंख्या वृध्दी झाली आहे. लोकसंख्या संसाधनाच्या अभ्यासात लोकसंख्या वृध्दीला महत्वाचे स्थान आहे. १८ व्या व १९ व्या शतकात डॅनियल बरनौली, मॉटीयन यांनी लोकसंख्या वैशिष्टयांचा अभ्यास केला. माल्थस आणि मार्क्स यांच्या लोकसंख्याविषयक सिध्दांतानी लोकसंख्या शास्त्र अभ्यासाला जास्त गती मिळाली. जेष्ठ गणिततज्ञ माल्थसने जगातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचे निरिक्षण करून भूमितीय श्रेणी व गणितीय श्रेणी वा संकल्पना मांडल्या. माल्थस यांनी आपल्या सिध्दांतामध्ये अन्नधान्यापेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग खूप जास्त आहे. त्यामुळे अन्नधान्याच्या समस्या निर्माण होतात असे सांगितले, तर मार्क्स यांनी लोकसंख्या समस्या निर्माण होण्यास विशिष्ट समाजव्यवस्थान कारणीभूत ठरते असे मत मांडले. दुसऱ्या महायुध्दानंतर लोकसंख्या हा घटक अनेक देशात विकासास अडथळा होऊ लागला. त्यामुळे लोकसंख्या अभ्यासाम गती मिळाली. कारसॉऊर्स या लोकसंख्या विचारवंताने The Population Problem: A Study in evalution या पुस्तकांत लोकसंख्या वाढ आणि समस्या मांडल्या. फ्रेड्रिक रेंटझेल (१८४४-१९०४) या भूगोल तज्ञांने मानववंश भूगोल या ज्ञानशाखेचा पुरस्कार करून लोकसंख्येची वैशिष्टे सांगितली. २ एप्रिल १९५३ रोजी झालेल्या असोशियन ऑफ अमेरिकन जिओग्राफर्स च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत जी.टी. त्रिवार्थी यानी लोकसंख्या भूगोलास भूगोलाची एक स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता मिळावी असे मत मांडले या मताचा सर्व भूगोल अभ्यासकांनी विचार करून लोकसंख्या भूगोलास भूगोल विषयांची स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता देण्यात आली. तेव्हापासून लोकसंख्या भूगोल हा सामाजीकशास्त्रातील एक महत्वाचा विषय समजला जातो. यामुळे लोकसंख्य अभ्यासाला गती प्राप्त झाली म्हणून जी. टी. त्रिवार्था याना लोकसंख्या भूगोलाचा जनक मानले जाते. जी.टी. त्रिवार्था यांनी नंतर लोकसंख्या भूगोलाच्या विकासात भर टाकण्याचे कार्य केले.

प्रकरण रुपरेषा :

प्रकरण १) प्रस्तावना

१.१ प्रस्तावना

१.२ लोकसंख्या भूगोलाची व्याख्या

१.३ लोकसंख्या भूगोलाची व्याप्ती

१.४ भारतातील लोकसंख्या भूगोलाचा विकास

१.५ उद्दिष्टे

१.६ संशोधन पद्धती

१.७ संशोधन साहित्याचा आढावा

१.८ गृहीतके

१.९ संशोधनाच्या मर्यादा

१.१० संदर्भ सूची.

प्रकरण २) प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक रचना

२.१ प्रस्तावना

२.२ स्थान, व विस्तार

२.३. प्राकृतिक रचना

२.४.भूगर्भरचना

२.५.नदीप्रणाली

२.६. हवामान

२.७. मृदा

२.८.नैसर्गिक वनस्पती

२.९.खनिजे

सामाजिक , आर्थिक रचना

२.१० प्रस्तावना

२.११ वस्ती

२.१२ व्यवसाय

२.१३ जमीन

२.१४ भूमिउपयोजन

२.१५ जलसिंचन

२.१६ शैक्षणिक सुविधा

२.१७ उद्योगधंदे

२.१८ वाहतूक

२.१९ संदेशवहन

प्रकरण ३) लोकसंख्या वाढ

३.१ प्रस्तावना

३.२ लोकसंख्या वाढीचा अर्थ

३.३ लोकसंख्या वाढीचा कल

३.४ लोकसंख्या वाढीची अभिक्षेत्रीय भिन्नता

३.५ लोकसंख्या वाढीचे स्थळ काल परत्वे बदल

३.६ लोकसंख्येचे तालुकानिहाय ग्रामीण वाढ

३.७ लोकसंख्येची तालुकानिहाय नागरी वाढ

३.८ ढोबळ जन्मदर

३.९ स्थलांतर

प्रकरण ४) लोकसंख्या वितरण व घनता

४.१ प्रस्तावना

४.२ लोकसंख्येचे वितरण

४.३ लोकसंख्येची घनता

४.४ लोकसंखेच्या घनतेचे कल

४.५ लोकसंखेच्या घनतेचे बदल

४.६ लोकसंख्येची ग्रामीण घनता

४.७ लोकसंख्येची नागरी घनता

४.८ कृषी घनता

प्रकरण ५) लोकसंखेच्या लिंगगुणोत्तराची रचना

५.१. प्रस्तावना

५.२. लिंगगुणोत्तराची संकल्पना

५.३. लिंगगुणोत्तराची अभिषेत्रीय भिन्नता

५.४.मंडळ निहाय ग्रामीण लिंगगुणोत्तर

५.५.मंडळ निहाय नागरी लिंगगुणोत्तर

५.६.बाल लिंगगुणोत्तर

प्रकरण ६) लोकसंखेच्या साक्षरतेची रचना

६.१. प्रस्तावना

६.२. साक्षरतेची संकल्पना

६.३. साक्षरतेची भिन्नता

६.४. साक्षरतेची अभिषेत्रीय प्रारूप

६.५.मंडळ निहाय साक्षरता

६.६.मंडळ निहाय पुरुषांची साक्षरता

६.७.मंडळ निहाय स्त्रियांची साक्षरता

६.८. नागरी साक्षरता

६.९. ग्रामीण साक्षरता

प्रकरण ७) . नागरी करणाचे प्रारूपे

७.१. प्रस्तावना

७.२. नागरीकरणाचे प्रारूपे.

७.३. नागरीकरणाची भिन्नता.

७.२. नागरीकरणाचे स्थलकालपरत्वे बदल .

७.३. नागरीकरणाची वाढ.

७.३. नागरी केंद्रातील लोकसंख्येचा आकार,लिंगगुणोतर,आणि साक्षरतेचा दर.

७.३. नागरी केंद्रातील कार्याचे वर्गीकरण.

प्रकरण ८) . निष्कर्ष समस्या आणि उपाययोजना.

७.१. प्रस्तावना

७.२. निष्कर्ष

७.३. समस्या

७.४.उपाययोजना

संदर्भ ग्रंथ :

1) Tripathi, R.R. Population Geography, Common Worth Publishers, New Delhi.
2) Zelinsky, W. Biblographic Guide to Population Geography Chicago University Press Chicago 1962.
3) Ackerman.E.A. (1970) "Geography and Demography" in George J.Demko et.al Population Geography : A Reader Mc-Graw Hill Book Company, New York.
4) Banerjee M. 1976 The Pattern of Sex Ratios in Singhbhung District Bihar Geographical Review of India. Vol.39 Kolkata.
5) Arunachalam.B. (1976) "Basic Geography" Deepak Prakasha, Bombay.
6) Badari V.S. (1991) " Population Growth Rate in India : Some Hopeful Singns" Indian Association for the Study of Population Thiruvanthapuram.
7) Banerjee M. 1976 : The Pattern of Sex Ratios in Singhbhung District : Bihar, Geographical Review of Inia. Vol.39 Kolkata.
8) Barde C.S. (1989) : The Population Characteristics of Goa" unpublished M.Phil. Dissertation, University of Pune.
9) Chandna R.C. & Singhu M.S. (1989) : Introduction to Population Geography Kalyani Publishers, Nw Delhi.
10) Padhy S.S. 1961 Melghat - A Study in Papulation : Mumbay Geograpical Magazine 1961 PP.0
11) Trewartha G.T. (1970) : A Case for Population Geography" Annals of the Association of American Geographers, New York.

मराठी संदर्भ :

1.कुंभार अर्जुन, (1994), प्रात्यक्षिक भूगोल, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर

2.घारपुरे विट्ठल (1999), लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन..

3.वाघमारे एन. के. (2009), नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या वाशिष्ट्याचाभौगोलिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध स्वा.रा.ती.म. विद्यापीठ.

4.दुधाटे शोभा (2013), औरंगाबाद जिल्ह्यातील लोकसंख्या व कृषी भूमी उपयोजनाचा भोगेलिक अभ्यास, अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध

5.डोणे कुसूम (2013), लोकसंख्या भूगोल, अरुण प्रकशन जातूर,

6.पाठक अनी (1970) आर्थिक भूगोल, राणे प्रकाशन, पुणे- 30.

7.सोनुले यु.बी. (2011). मानवी भूगोल, गटागट प्रकाशन, लातूर

८. सुरेश फुले (२००३)), लोकसंख्या भूगोल ,अभिजित प्रकाशन लातूर

मार्गदर्शक
डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे
(बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी)

संशोधक
महादेव देविदास सजगणे
एम.ए.भूगोल,(सेट)